ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधान: ” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
R 8 No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख ८ ऑगस्ट, १९५६ | अंक ३१

## विविध माहिती

**मासे गोठविण्याचा कारखाना**—क्लिॉन येथें मासे गोठविण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी जरूर असलेला बर्फ तयार करण्याचा कारखानाहि निघणार आहे. दोन्ही कारखान्यांना मिळून ५ लाख रुपये खर्च येईल. कारखान्याच्या शीतगृहांत ३०० ते ४०० टन मासे गोठवून सांठवितां येतील.

**प्राप्तीवरील करांत सूट**—सरकारी नौकरांनीं भरावयाच्या प्राप्तीवरील कराच्या रकमेंत दोन बाबतींत सूट देण्यांत येणार आहे. त्यांच्या मोटारी चालू ठेवण्यासाठी येणारा खर्च आणि सरकारी कामासाठी घेतलेल्या पुस्तकांचा खर्च, ह्या त्या बाबी होत.

**डुकराच्या मांसाला बंदी**—इस्राएल देशाच्या पार्लमेंटनें डुकरांची पैदास, त्यांचा व्यापार व त्यांचें मांस ह्यावर नियंत्रण घालण्याचे अगर बंदी घालण्याचे अधिकार स्थानिक–स्वराज्य संस्थांना दिले आहेत. ज्यू जमातींतील सनातनी लोकांच्या मतानें डुकराच मांस खाणें धर्मविरुद्ध आहे. त्यांनीं अशा प्रकारचा अधिकार देणाऱ्या कायद्याबद्दल चळवळ चालविली होती.

**बांबूंचा उपयोग करण्याची योजना**—पश्चिम बंगालमधील बांबूंचा उपयोग करण्याची योजना हातीं घेण्यांत येणार आहे. बांबूंपासून बनवितां येणाऱ्या मालाचें उत्पादन करण्यासाठी जपानी तज्ज्ञाचे देखरेखीखाली एक केंद्र उघडण्यांत येईल. पूर्व पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांना काम पुरविण्यासाठी केंद्राचा उपयोग होईल.

**विमा कंपन्यांतील अफरातफर**—१९ जानेवारी, १९५६ रोजीं भारतीय सरकारनें आयुर्विम्याचा धंदा आपल्या मालकीचा केला. त्या वेळीं सरकारनें नेमलेल्या कस्टोडिअन्सना ५ विमा कंपन्यांत पैशाची अफरातफर झाली असल्याचें आढळून आलें. सर्व कंपन्यांत मिळून ७० लाखांवर रकमेची अफरातफर झाली आहे.

**अफगाणिस्थानांत रशिअन तज्ज्ञ**—अफगाणिस्थानाला पाटबंधाऱ्यांच्या कामीं साह्य करण्याचा करार रशिआनें केला आहे. दोन धरणें आणि एक कालवा बांधण्यासाठी प्राथमिक पहाणीचें काम रशिअन तज्ज्ञ करणार आहेत. कालवा जलालाबाद शहराजवळ काढण्यांत येणार आहे. त्यामधून वहाणाऱ्या पाण्यानें सुमारें ५० लाख एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल.

**नवीन नाण्यांचा परिचय**—दशांक पद्धतीवर आधारलेलीं नवीं नाणीं १९५७ च्या एप्रिलपासून वापरांत येणार आहेत. ह्या नाण्यांचा रेल्वेच्या नौकरांना व जनतेला परिचय व्हावा म्हणून सदर्न रेल्वेच्या ५० स्टेशनावर त्यांचा एक एक संच पहाण्यासाठी ठेवण्यांत येणार आहे.

**व्यवसायकरांतून सुटका**—एर्नाकुलम् म्युनिसिपल कौन्सिलनें असा ठराव मंजूर केला आहे कीं, ज्या लोकांचें मासिक उत्पन्न १०० रुपये अगर त्यापेक्षा कमी असेल त्यांना व्यवसाय कर देण्यांतून मुक्त करण्यांत यावें. सध्यांची मर्यादा ५० रुपये मासिक उत्पन्नाची आहे. वाढत्या महागाईला तोंड देण्यास मध्यमवर्गाला व गरिबांना सोपें जावें म्हणून हा ठराव करण्यांत आला आहे.

**म्हैसूर येथील दसऱ्याचें प्रदर्शन**—दरवर्षी दसऱ्याच्या सणानिमित्त म्हैसूरमध्यें भरविण्यांत येणारें प्रदर्शन यंदां ५ ऑक्टोबरपासून २८ ऑक्टोबरपर्यंत भरणार आहे. भारतीय सरकारचीं आणि राज्यसरकारचीं बरींच खातीं प्रदर्शनांत भाग घेणार आहेत. प्रदर्शनांत टेलिव्हिजन आणि अणुशक्तीचा शांतताकालीन उपयोग, ह्याविषयीं कांहीं सामुग्री ठेवण्यांत येणार आहे.

**राष्ट्रीय हमरस्त्यांसाठी तरतूद**—भारताचे दुय्यम वहातुक मंत्री श्री. अलगेसन ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, राष्ट्रीय हमरस्ते बांधण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ५५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ते असेंहि म्हणाले कीं अधिक कामासाठी सरकारकडे आणखी रक्कम मागण्यांत येण्याचा संभव आहे. तसें झाल्यास एकूण रक्कम ८५ कोटी रुपयांच्या घरांत जाईल.

**हैदराबाद राज्याचा विकास**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत हैदराबादच्या राज्यांत यांत्रिक हत्यारें, सोनें, कोळसा, सिमेंट, साखर व कागद ह्यांच्या उत्पादनांत वाढ होईल अशी माहिती जाहीर करण्यांत आली आहे. ह्याच अवधींत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी एक सुताची गिरणीहि काढण्यांत येणार आहे.

**भांडवलाचें उद्दिष्ट कमी करा**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भांडवलाच्या गुंतवणुकीचें जें उद्दिष्ट सरकारनें ठरविलें आहे, तें कमी करण्याची सूचना डॉ. शेणॉय ह्यांनीं केली आहे. अन्नधान्याच्या किंमती भलत्याच वाढूं नयेत म्हणून ही उपाययोजना त्यांनीं सुचविली आहे. धान्याचें वांटप अगर इतर नियंत्रणें हे उपाय त्यांच्या मतें अपुरे आहेत.

**भूकंप पीडितांना मदत**—कच्छमधील भूकंपाच्या तडाख्यांत सांपडून निराधार झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी कच्छच्या सरकारनें ३० लाख रुपये खर्च येणारी योजना आंखली असून ती मंजुरीसाठी भारतीय सरकारकडे पाठविली आहे. झालेल्या नुकसानीबाबत एक तपशीलवार अहवालहि पाठविण्यांत आला आहे.

## मुंबई राज्यांतील कामगारसंघ
### १९५४–५५ चा अहवाल

| ३१ मार्च अखेर | वर्षाच्या प्रारंभींचे कमागार संघ | ह्यावर्षी नोंद लेले संघ | ह्यावर्षी कमी झालेले संघ | वर्षअखेर नोंद अस-लेले संघ |
|---|---|---|---|---|
| १९४४–४५ | ९१ | १९ | ९ | १०१ |
| १९४५–४६ | १०१ | २३ | ९ | ११५ |
| १९४६–४७ | ११५ | ८० | ११ | १८४ |
| १९४७–४८ | १८४ | १६६ | २१ | ३२९ |
| १९४८–४९ | ३२९ | १४९ | ३६ | ४४२ |
| १९४९–५० | ४४२ | २२१ | ४२ | ५८१ |
| १९५०–५१ | ५८१ | १५५ | १०१ | ६३५ |
| १९५१–५२ | ६३५ | १५८ | १२१ | ६७२ |
| १९५२–५३ | ६७२ | १४५ | १०५ | ७१२ |
| १९५३–५४ | ७१२ | १९७ | ९७ | ८१२ |
| १९५४–५५ | ८१२ | २११ | १११ | ९१२ |

### ९१२ पैकी ९०७ संघांची वर्गवारी

| गट | नोंदलेले संघ | सभासद संख्या |
|---|---|---|
| १. शेती, इत्यादि | १० | १,९४१ |
| २. खाणी | ३ | ६,२७३ |
| ३. कारखाने | ३९५ | ४,३४,२५९ |
| ४. बांधकाम | ८ | २,४९६ |
| ५. वीज, गॅस, इत्यादि | ३९ | ८,१६३ |
| ६. व्यापार | ११७ | २४,१७४ |
| ७. वहातुक, इत्यादि | ११५ | २,४०,४७२ |
| ८. बँका, इत्यादि | १११ | ४०,२५९ |
| ९. इतर | १०९ | ३१,६३५ |
| एकूण | ९०७ | ७,८९,६७२ |

### संघांची प्रमुख जिल्हावार वाटणी

| जिल्हा | संख्या | त्यांचे सभासद |
|---|---|---|
| अहमदाबाद | ६७ | १,१६,९०९ |
| अहमदनगर | २१ | ९,७८५ |
| बडोदें | ३१ | १२,१६४ |
| बेळगांव | १० | ४,२३४ |
| बृहन् मुंबई | ३७५ | ५,०५,२४६ |
| पू. खानदेश | ३४ | १०,६८० |
| खेडा | १९ | ८,०१८ |
| मेहसाणा | २० | ९,१७२ |
| नाशिक | ४० | ११,३७३ |
| पुणें | ९५ | ३८,१४५ |
| सोलापूर | २४ | १५,१०९ |
| सुरत | ४३ | १३,२६७ |
| ठाणें | २९ | ९,९२१ |
| एकूण | ९०७ | ७,८९,६७२ |

## सुएझच्या उत्पन्नांतून अस्वान धरण बांधतां येईल काय?

सुएझ कालव्याच्या चालू उत्पन्नांतून अस्वान धरण बांधण्याची योजना प्रेसिडेंट नासरनें जाहीर केली आहे; परंतु तें उत्पन्न धरण बांधण्यास पुरें पडणार नाहीं, अशी टीका फिनॅन्शिअल टाइम्सनें केली आहे. तें पत्र म्हणतें, कीं २७ जुलै रोजीं पॅरिस येथील स्टॉक एक्सेंजवरील किंमतीप्रमाणें भागदारांना द्यावयाची नुकसानभरपाई ६,५०,००,००० पौंड भरेल, आणि ती देण्याचें प्रे. नासरनें मान्य केलें आहे. १९५५ अखेर सुएझ कॅनॉल कंपनीची जिंदगी ६ कोटी, ४० लक्ष पौंड होती. त्यापैकी २ कोटी, २० लक्ष पौंड स्थायी स्वरूपाची होती; ३ कोटी, ९० लक्ष पौंडांची रोख्यांत गुंतवणूक होती आणि ३० लक्ष पौंड खेळत्या स्वरूपांत होते. १९५५ सालीं कंपनीला एकूण ३ कोटी, ५० लक्ष पौंड उत्पन्न मिळालें. त्यापैकी ३ कोटी, २५ लक्ष पौंड कालव्याच्या वहातुकीवरील पट्टीपासून मिळाले. १ कोटी, ५० लक्ष पौंड चालू खर्चासाठी जाऊन ३० लक्ष पौंड जादा खर्च आणि व्याज ह्यांनीं घेतले. ३० लक्ष पौंड भांडवली खर्चासाठी बाजूस काढून ठेवण्यांत आले. सुएझ कालवा सुव्यस्थित राखून, जादा वहातुकीसाठी तो आणखी सुधारावयाचा असेल तर इजिप्तला दरसाल आणखी ज्यास्तींत ज्यास्त ९० लक्ष पौंड मिळूं शकतील. आज दरसाल कर आणि रॉयल्टी ह्या स्वरूपांत त्याला ५० लक्ष पौंड मिळत आहेतच. अस्वान धरणाचा बांधणीखर्च ४० कोटी पौंड होईल, असा अंदाज आहे. त्यापैकी कांहीं भाग ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं सोसण्याचें मान्य केलें होतें व जागतिक बँक कर्जही देणार होती. दरसाल मिळणाऱ्या उत्पन्नांतूनच धरण बांधावयाचें म्हटलें, तर कालव्याचें ३० वर्षांचें तरी उत्पन्न त्यासाठी लागेल. कालव्याचा उपयोग करणारांकडून घ्यावयाची पट्टी वाढविण्यानें जास्त उत्पन्न मिळूं शकेल. पण, त्यामुळें सुएझ कालव्याऐवजीं हैफा ते अकबा असा दुसरा कालवा खोदण्याकडे, तेलाचे नवे नळ टाकण्याकडे किंवा केपला वळसा घालून जावें लागल्यामुळें तेलवाहू मोठ्या बोटी बांधण्याकडे पाश्चात्य देश लक्ष पुरवितील. अर्थात्, ह्या सर्व योजना मोठ्या खर्चाच्या व कालावधि लागणाऱ्या आहेत.

### अमेरिकन बँकांवरील दरोडे

अमेरिकेंत, दररोज निदान एका तरी बँकेवर दरोडा पडतो. प्रत्येक ४० बँकांत एका बँकेस तरी चालू वर्षी दरोडा अनुभवास येईल.

### भूदान चळवळीची प्रगति

जून, १९५६ अखेर भूदान चळवळीला सबंद भारतांत मिळू एकूण ४१,०३,७४४ एकर जमीन मिळाली. त्यापैकी ५,०१,२२ एकर जमीन आतांपर्यंत १,५२,५३७ भूमिहीनांना वाटण्यां आली आहे.

तमाम दंतरोगांवर
★ नाकछाप म्हणजेच काळी दंत पावडर

अर्थ

बुधवार, ता. ८ ऑगस्ट, १९५६



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## भारताच्या आर्थिक धोरणाची चिकित्सा

### परिस्थिति आणि उद्दिष्टें ह्यांचा मेळ

जागतिक बँकेचे प्रतिनिधी भारतांत नुकतेंच येऊन गेले. त्यानें सबंद देशभर प्रवास करून एक १३ पानी अहवाल तयार केला आहे. हा अहवाल अर्थमंत्रि, श्री. देशमुख, ह्यांचेकडे पाठवितांना, प्रतिनिधींचे नेते श्री. टॉमस एच. मॅकिट्रिक, ह्यांनीं म्हटलें आहे कीं, त्यांचा अहवाल सद्हेतुपूर्वक लिहिलेला असून त्यांतील सूचना भारताला उपयुक्त वाटतील अशी त्यांना आशा आहे. भारताला यापुढें कर्ज देतांना, ह्या देशाच्या आर्थिक परिस्थितीची, म्हणजे पतीची बँकेला योग्य कल्पना असावी, हा प्रस्तुत पहाणीचा उद्देश होता.

गेल्या पांच वर्षांतील प्रगति ह्या मंडळाला भरीव स्वरूपाची वाटली. वाढतें राष्ट्रीय उत्पन्न आणि रहाणीच्या दर्जांत वाढ, एवढ्यानेंच ही प्रगति मोजतां येणार नाहीं; अप्रत्यक्ष गोष्टींतहि ती प्रतिबिंबित झाली आहे. उदाहरणार्थ, नवा उत्साह आणि आशा; त्याचप्रमाणें स्वोद्धाराची उत्कट इच्छा, ह्यांचीहि दखल घेतली पाहिजे, असें मंडळानें नमूद केलें आहे. ह्या प्रशस्तीचा वास्तव अर्थ जाणत्या लोकांना सहज समजण्याजोगा आहे.

पंचवार्षिक योजना केंवढी मोठी असावी ? " लोकांना ती आकर्षक वाटावी व त्यासाठी प्रयत्न करण्यास ते उद्युक्त व्हावेत, पण त्याचबरोबर ठरविलेलीं लक्ष्यें आवाक्यांतील असावींत. म्हणजे ती गाठण्यांत अपयश आलें तरी त्याचे मानसिक दुष्परिणाम होणार नाहींत " असा अभिप्राय मंडळानें व्यक्त केला आहे; आणि त्याविषयीं दुमत होण्याचें कारणच नाहीं. मंडळानें, भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत प्रत्यक्ष कपात सुचविली नसली तरी वेळोवेळ त्यांत परिस्थितीस अनुसरून बदल करावा लागेल, असें म्हटलें आहे.

तुटीच्या अर्थव्यवस्थेविषयीं मंडळानें धोक्याची सूचना देऊन ठेवली आहे. पंचवार्षिक योजनेंत कृत्रिम चलनाला जें मोठें स्थान दिलेलें आहे, त्यामुळें देशाच्या नाणेंविषयक गरजांचे मानानें पैशाचा पुरवठा अधिक होईल, असें मंडळाला वाटतें. योजनेचा खर्च भागविण्यासाठी रेल्वेचे दर, विजेचे दर, पाण्याचे दर, बंदरांचे दर, इत्यादींत वाढ मंडळानें सुचविली आहे आणि सरकारी उपक्रमांनीं ज्यास्त उत्पन्न मिळविलें पाहिजे, असें प्रतिपादन केलें आहे. प्रत्यक्ष करांच्या वाढीमुळें बिनसरकारी क्षेत्रावर फार प्रतिकूल परिणाम होणार नाहीं, ह्याची दक्षता घ्यावी लागेल. रेल्वेज आणि बंदरें ह्यांना मालाची वहातुक पुरी पाडणें अवघड जात आहे, असें मंडळाला आढळून आलें. वहातुकीच्या साधनांत शक्य त्या मार्गांनीं वाढ होण्याची गरज अत्यंत तांतडीची आहे. रेल्वेचे दर अशा रीतीनें बदलावेत कीं त्यामुळें इतर वहातुकीचीं साधनें वापरणें अपरिहार्य व्हावें आणि रेल्वेजवरील ताण कमी व्हावा, अशीहि मंडळाची शिफारस आहे. वहातुकीच्या साधनांत वाढ करण्यासाठी त्यांत आणखी भांडवल गुंतविण्यापूर्वीं, कार्यक्षमता वाढविण्याकडे लक्ष पुरवावें, असें मंडळानें स्पष्टपणें नमूद केलें आहे. ह्याचा अर्थ, आजची व्यवस्था पुरेशी कार्यक्षम नाहीं, त्यांत सुधारणेस भरपूर वाव आहे, असाच होतो.

ग्रामोद्योगाबाबत सरकारी धोरणाच्या कित्येक अंगांविषयीं साशंकता वाटते. रोजगार निर्माण करण्याची इच्छा योग्य असली तरी लहान प्रमाणावरील उद्योगांत वाढ करण्याचे मार्गांतील अडचणींची पुरी कल्पना सरकारला नाहीं. गिरण्यांत ऑटोमॅटिक माग बसविण्यास परवानगी देतांना, त्याचें उत्पादन निर्गतीसाठी राखून ठेवण्याची अट व तें भारतांतच खपविलें तर त्याला दंड, ही योजना मंडळाला अव्यवहार्य वाटते. हातकताई व ग्रामोद्योगाचे तत्त्वावर विणकरांची संघटना ह्यांत अपेक्षेप्रमाणें यश आलें नाहीं तर कापडविषयक सरकारी धोरण बदलण्यांत येईल, असें मंडळाला सांगण्यांत आलें. पण, मंडळाचे मतें हें शहाणपण उशिरा सुचलें तर त्यानंतर करावयाची दुरुस्ती अंमलांत येण्यास अतिशय विलंब लागेल आणि तो हितावह होणार नाहीं. सध्यांच्या धोरणामुळें, कापडाच्या अंतर्गत किंमती अप्रस्तुत वाढतील किंवा परराष्ट्रीय हुंडणावळीची प्राप्ति कमी होत चालली असूनहि निर्गत आणखी रोडावेल, असें मंडळाचें मत आहे.

परदेशियांच्या भारतांतील गुंतवणुकीबद्दल सरकारी व बिन-सरकारी वृत्ति नकारात्मक, नाखुषीची असतां कामा नये; देशांत भांडवल गुंतविण्याच्या संधींची सरकारनें उलट जाहिरात केली पाहिजे व त्यासाठी स्वतंत्र खातेंच त्यानें स्थापन करावें, अशी मंडळाची शिफारस आहे. सरकारनें परदेशीं कंपन्यांत स्वतःचें मताधिक्य राहील एवढें भांडवल गुंतविण्याचा हट्ट धरूं नये, कारण त्यामुळें परकीय भांडवलाला पुरेसें आकर्षण उरणार नाहीं आणि सरकारलाहि स्वतःचें मोठें भांडवल घालण्यासाठी ताण सहन करावा लागणार नाहीं, अशी मंडळाची सूचना आहे.

---

## जगांतील सर्वांत मोठी बँक

वीस वर्षांपूर्वी, मिडलंड बँक ही ब्रिटिश बँक सबंद जगांत मोठी होती. त्यानंतरच्या सहा बँकांत पांच बँका ब्रिटिशच होत्या. आतां, जगांतील पहिल्या तीन अनुक्रमाच्या जागा अमेरिकन बँकांनीं घेतल्या आहेत. त्यानंतरच्या तीन जागा ब्रिटिश बँकांच्या वांट्यास आल्या आहेत.

जगांतील सर्वांत मोठ्या बँकेची ( दि बँक ऑफ अमेरिकेची ) जिंदगी ३४५ कोटि पौंड आहे. चेस मॅनहटन बँकेची जिंदगी २७० कोटि पौंड भरते, तर फर्स्ट नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्कची जिंदगी २५० कोटि पौंड आहे. ग्रेट ब्रिटनच्या सर्वांत मोठ्या बँकेची ( मिडलंड बँकेची ) जिंदगी १४५ कोटि पौंड सुद्धां नाहीं. त्या खालोखाल बार्कलेज बँक ( १३५ कोटि पौंड ) व लॉईड्स बँक ( ११५ कोटि पौंड ) ह्या बँका येतात.

शाखांच्या संख्येच्या दृष्टीनें विचार केला, तर तीनहि अमेरिकन बँकांच्या प्रत्येकीं ३०० शाखा आहेत. पण ग्रेट ब्रिटनमधील सर्वांत मोठ्या तीन बँकांच्या प्रत्येकी २,००० शाखा आहेत.

## सुएझ कालव्याचा इतिहास व महत्त्व

इजिप्तच्या सरकारनें सुएझ कालव्याच्या कंपनीचें राष्ट्रीयीकरण करून ती आपल्या ताब्यांत घेतली आहे. हा जगप्रसिद्ध कालवा, तांबडा समुद्र आणि भूमध्य समुद्र ह्यांना जोडणारा असून पश्चिम युरोपांतील देशांना पूर्व आशिआंतील देशांशीं दळणवळण ठेवण्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. पोर्टसैद ते सुएझपर्यंत कालव्याची लांबी १०३ मैल आहे. हा सर्व भाग वालुकामय आहे. एंजिनिअर्स लोक कालव्यासाठी १० वर्षे खपत होते. अखेर १७ नोव्हेंबर, १८६९ ह्या दिवशीं तो वहातुकीला खुला करण्यांत आला.

कायद्याच्या दृष्टीनें विचार करतां, कंपनी इजिप्तची आहे. पण तिचा कारभार मात्र पॅरीस येथील मुख्य कचेरीमार्फत चालविला जात असे. १८६८ सालीं कंपनीला इजिप्तच्या सरकारकडून मिळालेल्या हक्कांची मुदत संपत येत आहे. कंपनीच्या गव्हर्निंग बोर्डावर एकूण ३२ डायरेक्टर्स आहेत. त्यापैकीं १६ फ्रेंच, ९ ब्रिटिश, ५ इजिप्शिअन, १ अमेरिकन आणि १ डच आहे. फर्डिनंड दि लेसप्स ह्या फ्रेंच एंजिनिअरनें कालवा बांधला, त्या-वेळीं त्याला वहातुकीसंबंधी ९९ वर्षे मुदतीचे हक्क देण्यांत आलेले होते. ही मुदत संपल्यावर आणखी मुदत देण्यांत येणार नाहीं असें इजिप्तच्या सरकारनें पूर्वी जाहीर केलेलें आहे. कंपनीचा कारभार पहाणाऱ्या बोर्डाला इजिप्त सरकारच्या प्रतिनिधींनें गेल्या जून महिन्यांत पुढीलप्रमाणें सांगितलें होतें: १६ नोव्हेंबर, १९६८ ह्या दिवशीं मूळ मुदत संपत आहे. त्यानंतर एका क्षणानेंहि मुदत वाढविण्याची सरकारची तयारी नाहीं. इतकेंच नव्हे तर, त्या दिवशीं मध्यरात्रीच्या १२ नंतर कंपनीचा कारभार आपल्या हातीं घेण्याची योजना सरकारनें तयार केलेली आहे." १९४९ सालीं कालव्यासंबंधीं कंपनीबरोबर एक करार करण्यांत आला होता. ह्या कराराच्या शर्तीप्रमाणें, कंपनीच्या कारभाराबाबत इजिप्तला कांहीं खास हक्क देण्यांत आले. त्याचप्रमाणें इजिप्शिअन नागरिकांना शिक्षण देऊन कंपनींत नोकरीला ठेवण्याचेंहि मान्य करण्यांत आलें. शिवाय, कंपनीच्या नफ्यांत इजिप्तच्या सरकारला मिळणारा वाटा वाढवून तो एकूण नफ्याच्या ७ टक्के करण्यांत आला. त्याचबरोबर दरवर्षी किमान ३,५०,००० पौंड नफा देण्याची हमीहि इजिप्तच्या सरकारला देण्यांत आली. १९ ऑक्टोबर, १९५४ रोजीं ब्रिटन आणि इजिप्त ह्यांच्या दरम्यान एक राजकीय करार करण्यांत आला. करारांतील अटींप्रमाणें सुएझ कालव्याच्या विभागांत असलेले ८०,००० ब्रिटिश लष्कर ब्रिटननें २० महिन्यांत काढून घ्यावें असें ठरलें. तुर्कस्थान अगर दुसरें एखादें अरब राष्ट्र ह्यांच्यावर परचक्र आल्यास कालव्याच्या विभागांत पुन्हां प्रवेश करण्याचा हक्क ब्रिटनला देण्यांत आलेला आहे. पण ह्या राजकीय कराराचा कंपनीच्या हक्कसंबंधांवर कसलाहि परिणाम झालेला नाहीं.

कंपनीचें भांडवल एकूण ७,९९,९९८ भागांत विभागलें गेलेलें आहे. त्यापैकीं आज ब्रिटनच्या मालकीचें ३,५३,५०४ भाग आहेत. कालव्याचा उपयोग ब्रिटनच्या बोटी सर्वांत अधिक प्रमाणांत करतात. १९५४ सालीं एकूण १३,१२५ बोटींनीं कालव्याचा उपयोग केला. त्यापैकीं ४,४९२ बोटी ब्रिटनच्या होत्या. ह्यावरून कालव्यांतून चालणाऱ्या सागरी वहातुकाचें ब्रिटनला किती महत्त्व आहे, तें लक्षांत येईल. ब्रिटनशिवाय इतर राष्ट्रांच्या बोटीहि कालव्याचा उपयोग करतात. १९५४ सालीं १,७३३ नॉर्वेजिअन बोटी, १,१३३ फ्रेंच बोटी, १,०१६ इटालिअन बोटी, ६३० डच बोटी, ३९३ अमेरिकन बोटी, ३३५ डॅनिश बोटी, ४५० स्वीडिश बोटी आणि ३०२ जर्मन बोटी कालव्यांतून गेल्या. त्यावर्षी कंपनीला वहातूक-फी म्हणून ३,०३,३८,००० पौंड उत्पन्न मिळालें. १९५४ सालीं प्रवासी बोटींनीं ५,२७,९७६ प्रवाशांना कालव्याच्या मार्गानें नेलें.

सुएझच्या कालव्याचें महत्त्व तेलाच्या वहातुकीच्या दृष्टीनें विशेषच आहे. मध्यपूर्वेंतील देशांत उत्पादनें करण्यांत येणारें खनिज तेल पश्चिम युरोपांतील देशांत नेण्याचा हा अतिशय जवळचा मार्ग आहे. इराणचें आखात, सौदी अरेबिया आणि कुवाइत ह्या भागांत उत्पन्न होणाऱ्या तेलाची वहातूक ह्याच कालव्याच्या मार्गें मुख्यतः होते. पश्चिम युरोपांतील राष्ट्रांना ह्या मार्गानें होणारा तेलाचा पुरवठा थांबला तर अनवस्था प्रसंग ओढवेल. ब्रिटनमध्यें बेकारीची लाट उसळून ५० लाख लोकांना कामधंद्याला मुकावें लागेल. त्याचप्रमाणें पश्चिम युरोपांतील इतर देशांची अर्थव्यवस्थाहि विस्कळित होऊन थंडावूं लागेल. तेलाचा पुरवठा केप ऑफ गुडहोपला वळसा घालून चालू ठेवतां येणें शक्य आहे. पण मार्ग लांबचा असल्यामुळें तेलाच्या किंमती वाढतील. तेलाचे नळ टाकण्याचा मार्ग फार खर्चाचा आणि राजकीयदृष्ट्या अस्थिर असलेल्या वातावरणांत धोक्याचाहि आहे.

---

## कंपन्यांचे स्पेशल ठराव

### महत्त्वाच्या बाबी प्रकट केल्या पाहिजेत

कंपनी कायद्याच्या १७३ व्या कलमाप्रमाणें, वार्षिक सभेंत खालील गोष्टींचा विचार केला जातो:—

(१) हिशेब, ताळेबंद, डायरेक्टरांचा व ऑडिटरांचा अहवाल.
(२) डिव्हिडंड जाहीर करणें.
(३) निवृत्त होणाऱ्या डायरेक्टरांची जागा भरणें.
(४) ऑडिटर्सची नेमणूक व त्यांचें वेतन ठरविणें.

इतर कोणत्याहि सभेंत केलेलें इतर कोणतेंहि काम 'स्पेशल' समजलें जातें.

'स्पेशल' कामाचा विचार सभेंत करावयाचा असेल, त्यावेळीं सभेच्या नोटिशीला एक निवेदन जोडून त्यांत अशा प्रत्येक कामाच्या बाबीविषयक जरूर तो तपशील दिला पाहिजे. प्रत्येक डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट, सेक्रेटरीज व ट्रेझरर्स, मॅनेजर, ह्यांचा त्यांतील हितसंबंध स्पष्टपणें दाखविला पाहिजे.

३१४, ३५६, ३५७, ३५८, ३६०, ३७० व ३७५ ह्या कलमांखालील ठराव 'स्पेशल' ह्या सदरांत पडतात. ह्या सर्व बाबतींत वरीलप्रमाणें निवेदनाची आवश्यकता आहे. सर्व कंपन्यांकडून हा कायदा पाळला जात नाहीं, अशा अर्थखात्याकडे तक्रारी पोंचल्या आहेत. म्हणून, सर्व कंपन्यांचें ह्याकडे लक्ष वेधण्यांत येत आहे आणि तद्विषयक तरतुदी पाळण्याची त्यांना सूचना दिली जात आहे. तसें झालें नाहीं तर १९२ कलमाखालीं जे ठराव रजिस्ट्रारकडे नोंदावे लागतात, ते नोंदण्यास रजिस्ट्रार नकार देतील. ज्या स्पेशल ठरावाबाबत सर्व तपशील प्रकट केलेला नाहीं हें उघड दिसेल, त्यांचे संबंधांत २३४ व्या कलमाप्रमाणें रजिस्ट्रार १७३ (२) कलमांत सांगितलेल्या स्टेटमेंटच्या प्रती मागवून घेईल. त्याचप्रमाणें इतर आवश्यक ती माहितीहि मिळवून, तो ठराव कायद्याला पूर्णपणें धरून आहे किंवा नाहीं तें तपासून पाहील.

## भाडेनियंत्रण कायद्याचें १३ (२) कलम

### दुसरी जागा मिळण्यासारखी आहे किंवा नाहीं हें केव्हां पहावयाचें ?

( मुंबई हायकोर्टाचा निवाडा )

प्रस्तुत केसमधील घराचा मालक प्रभाकर बळवंत माडगांवकर हा इसम असून शांताराम केशव श्रीरोडकर हा त्या घरांतील भाडेकरी होता. आपलें घर आपणांस स्वतः रहावयाकरितां पाहिजे आहे आणि म्हणून आपल्या घराचा ताबा आपणांस मिळावा याकरितां घरमालक माडगांवकर यांनीं कोर्टांत दावा आणला. मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या कलम १३ (२) खालीं भाडेकऱ्याला जागेंतून काढून देण्यासंबंधींची डिक्री देण्यापूर्वी घरमालकाला किंवा भाडेकऱ्याला दुसरी जागा मिळण्यासारखी आहे किंवा काय हें कोर्टाला पाहवयाचें असतें. प्रस्तुत केसमध्यें भाडेकरी श्रीरोडकर यांना दुसरी जागा मिळण्यासारखी आहे हें माडगांवकरांनीं दाखवून दिलें. त्या घराचें भाडें माडगांवकरांच्या घरभाड्यापेक्षा जास्त होतें. परंतु अव्वल कोर्टानें एकंदर परिस्थितीचा विचार करून असें ठरविलें कीं, भाडेकऱ्याला दुसरी जागा मिळण्यासारखी असल्यामुळें त्याला माडगांवकरांच्या घरांतून काढून टाकले तर भाडेकरी श्रीरोडकर यांचे विशेष हाल होणार नाहींत आणि श्रीरोडकरांना काढून लावलें नाहीं तर घरमालक माडगांवकर यांचे मात्र हाल होतील. असा विचार करून भाडेकरी श्रीरोडकर यांनीं माडगांवकर यांचें घर खाली करून द्यावें अशी डिक्री अव्वल कोर्टानें दिली.

यावर श्रीरोडकरांनीं अपील केलें. अपील सुनावणीस निघाल्यावर असें आढळून आलें कीं, अव्वल कोर्टाच्या डिक्रीच्या वेळेस श्रीरोडकर यांना जी दुसरी जागा मिळण्यासारखी होती ती त्यानंतर भरून गेली असून श्रीरोडकरांना अपील चालू असतांना मिळण्यासारखी नव्हती. घरमालकाला किंवा भाडेकऱ्याला दुसरी जागा मिळण्यासारखी आहे किंवा नाहीं हें अव्वल कोर्टाच्या डिक्रीच्या वेळेस पहावयाचें असून अपेलेट कोर्टाच्या डिक्रीच्या वेळेस पहावयाचें नसतें असा निकाल देऊन अपेलेट कोर्टानें अपील फेटाळून लावलें. यांवर श्रीरोडकर यांनीं हायकोर्टांत रिव्हिजन अर्ज केला.

मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या कलम १३ (२) खालीं घरमालकाला किंवा भाडेकऱ्याला दुसरी जागा मिळण्यासारखी आहे किंवा नाहीं हें केव्हां पहावयाचें असतें हा हायकोर्टापुढें एकच मुद्दा होता.

मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या कलम १३ (२) मध्यें जरी वर्तमानकाळ वापरला असला तरी घरमालकाला किंवा भाडेकऱ्याला दुसरी जागा मिळण्यासारखी आहे किंवा नाहीं हें भाडेकऱ्याला घरांतून घालवून देण्यासंबंधीं डिक्री देण्याच्या वेळेस पहावयाचें असतें. ती डिक्री अव्वल कोर्टाची असून अपेलेट कोर्टाची नाहीं. अव्वल कोर्टाच्या डिक्रीच्या वेळेस भाडेकऱ्याला दुसरी जागा मिळण्यासारखी आहे असें जर अव्वल कोर्टाला आढळून आलें तर भाडेकऱ्याला घरांतून काढून देण्यासंबंधींचा हुकूम कोर्ट देऊं शकतें. यावर भाडेकऱ्याला अपील करावयाचें असेल तर जी दुसरी जागा मिळण्यासारखी आहे ती पदरांत पाडून मगच त्यानें अपील लढवावयाचें असतें. अपिलाचा निकाल त्याच्याविरुद्ध गेला तरी दुसरी जागा त्यानें पदरांत पाडून घेतलेली असल्यामुळें त्याचे हाल होत नाहींत.

प्रस्तुत केसमध्यें अव्वल कोर्टाच्या डिक्रीच्या वेळेस श्रीरोडकरांना दुसरी जागा मिळण्यासारखी होती. त्यांनीं जागा खाली करून द्यावी असा हुकूम क. १३ (२) खालीं अव्वल कोर्ट देऊं शकतें. भाडेकऱ्यानें यावर केलेल्या अपिलाच्या वेळेस जी दुसरी जागा मिळण्यासारखी होती ती भरून गेलेली असली तरी त्यामुळें हरकत येत नाहीं. प्रस्तुत केसमध्यें खालील कोर्टाचा निकाल बरोबर होता असा निर्णय देऊन हायकोर्टानें रिव्हिजन-अर्ज नामंजूर केला; मात्र तसें करतेवेळीं श्रीरोडकर यांना दुसरी जागा पाहण्याकरितां थोडी मुदत दिली.

**सारांश**

मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या क. १३ (२) खालीं डिक्री देतेवेळीं घरमालक किंवा भाडेकरी यांना दुसरी जागा मिळण्यासारखी आहे किंवा नाहीं हें पहावयाचें असतें. तें पाहण्याची वेळ अव्वल कोर्टाच्या डिक्रीची तारीख असते. अपेलेट कोर्टाच्या डिक्रीच्या वेळेस तें पहावयाचें नसतें. अव्वल कोर्टाच्या डिक्रीच्या वेळेस भाडेकऱ्याला दुसरी जागा मिळण्यासारखी आहे असें जर अव्वल कोर्टाला आढळून आलें तर भाडेकऱ्यानें घर खाली करून द्यावें असा हुकूम अव्वल कोर्ट देऊं शकतें.

---

**भागदारांना नुकसानभरपाई**—म्हैसूर राज्यांतील कोलार येथील सोन्याच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें आहे. कंपनीच्या भागिदारांना नुकसानभरपाई म्हणून ११९ लाख रुपये देण्याचें म्हैसूरच्या सरकारनें कबूल केलें आहे. ही रक्कम देण्याबद्दल भारतीय सरकारनें म्हैसूरच्या सरकारला सुचविलें होतें.

**औद्योगिक सहकारी संघटना**—ठाणें जिल्ह्यांतील विविध प्रकारच्या सहकारी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक भरविण्यांत आली होती. ठाणे जिल्ह्यांत औद्योगिक सहकारी संघटना स्थापन करण्याचा निर्णय बैठकींत घेण्यांत आला. जिल्ह्यांत छोटे उद्योगधंदे काढण्यास मदत करणें व त्यांचें मार्गदर्शन करणें, असा संघटनेचा हेतु आहे.

**काश्मीरमधील खनिज संपत्ति**—काश्मीरमधील खनिज संपत्तीचा शोध करण्याचें काम भारतीय सरकारच्या संबंधित खात्यानें चालू केलें आहे. कोळसा, चुनखडीचा दगड व इतर खनिजांचा शोध करण्यांत येत आहे. काश्मीर राज्यांत सिमेंटचा कारखाना काढण्याच्या दृष्टीनें चुनखडीचा शोध महत्त्वाचा आहे.

**छोटे 'हेलिकॉप्टर'**—रशिआंतील कारखान्यांनीं एक छोटेखानी 'हेलिकॉप्टर' बनविलें आहे. त्याची घडी करतां येतें आणि जमिनीवर, समुद्रावर अगर दलदलीच्या प्रदेशावर तें उतरवितां येतें. जंगलांची व शेतजमिनींची पहाणी, समुद्रांच्या पृष्ठभागावरील माशांच्या थव्यांची टेहळणी करणें, इत्यादि कामासाठी त्याचा चांगला उपयोग होऊं शकेल.




**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना: १९१८.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

राष्ट्राकरितां बचत करा.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल रु. | १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल रु. | ७,५८,४०० |
| रिझर्व.........रु. | ६,९७,००० |
| ठेवी.........रु. | १,५१,००,००० |

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०२,२०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठे महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# बँक ऑफ पूना लिमिटेड

## ( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) २६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

—:व्याजाचे दर:—

चालू ठेव—अर्धा टक्का. सेव्हिंग्ज—दोन टक्के.
२ महिन्यांच्यापुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

☆ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फें | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फें | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

### भारतीय साखरेची निर्यात

भारतामधील साखरेच्या धंद्याची वाढ करण्यासाठी स्थापन करण्यांत आलेल्या कौन्सिलची पहिली बैठक दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. अन्न व शेतकी खात्याचे एक चिटणीस श्री. पुरी हे कौन्सिलचे अध्यक्ष आहेत. बैठकीचें उद्घाटन करतांना श्री. पुरी आपल्या भाषणांत म्हणाले कीं, १९५८–५९ च्या हंगामांत २ लाख टन साखरेची निर्यात करण्याची परवानगी भारतानें इंटरनॅशनल शुगर ॲग्रीमेंटमध्यें सामील झाल्यानंतर प्रथमच मागितली आहे. इंटरनॅशनल शुगर ॲग्रीमेंट हा साखर निर्माण करणाऱ्या राष्ट्रांतील एक आंतरराष्ट्रीय करार असून त्याचा उद्देश साखरेच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर नियंत्रण ठेवण्याचा आहे. साखरेची निर्यात व आयात ह्यावर मर्यादा घालून आंतरराष्ट्रीय पेठेंतील बाजारभाव वाजवी पातळीवर राखण्याचें कार्य करारानें करण्यांत येतें. ह्या करारांत सामील झाल्यामुळें भारताच्या साखरेच्या धंद्यांच्या विकासावर बंधनें पडतील असें भारताला वाटत होतें. म्हणून १९४२ पर्यंत भारत ह्या करारांत सहभागी झाला नाहीं. गेल्या जूनमध्यें संयुक्त–राष्ट्र-संघटनेनें पुरस्कारिलेली आंतरराष्ट्रीय साखर–परिषद न्यूयॉर्क येथें भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेंत भारतानें भाग घेतला होता. भारतामधील साखरेच्या धंद्याचा आतां कांहीं प्रमाणांत विकास झालेला असल्यामुळें साखरेची निर्यात करण्याची कुवत भारतांत आलेली आहे. म्हणून भारतीय प्रतिनिधींनीं वरील मागणी केली. १९५५–५६ च्या हंगामांत भारतामधील साखरेच्या कारखान्यांनीं १८·५४ लाख टन साखरेचें उत्पादन केलें. आतांपर्यंत झालेल्या हंगामी उत्पादनांत हें सर्वांत अधिक आहे. गेल्या सालच्या उत्पादनापेक्षा ३ लाख टन अधिक साखर तयार झाली.

**रुरकेला येथें नवें शहर**—रुरकेला येथें निघणाऱ्या पोलादाच्या कारखान्याभोंवतीं एक आधुनिक शहरच स्थापन करण्याचें ओरिसाच्या सरकारनें ठरविलें आहे. रुंद व नीट आंखलेले रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा आणि वीज ह्यांची सोय करण्यांत येणार आहे. शहरासाठीं लागणारी जमीन, मजूर आणि बांधकामासाठीं लागणारें साहित्य ह्यांचा भरपूर पुरवठा ह्या भागांत आहे.

**भारतीय बनावटीचा टंकलेखक**—गोदरेज कंपनीनें बनविलेला भारतामधील पहिलाच टंकलेखक लंडन येथील प्रदर्शनांत ठेवण्यांत आला आहे. ह्या टाइपरायटरमध्यें एकूण १,८०० सुटे भाग असून त्यांपैकीं अवघे ४ परदेशांतून आयात केलेले आहेत. त्यांची किंमत ३० रुपये आहे. टाइपरायटर तयार करणारा भारत हा आशिआंतील पहिलाच देश आहे.

**अणुशक्तीवर चालणारें वीजकेंद्र**—अणुशक्तीवर उपयोग करून वीज उत्पन्न करण्याचा अमेरिकेंतील पहिला कारखाना निम्मा–अधिक पुरा होत आला आहे. वीज–केंद्र बहुधा १९५७ च्या उन्हाळ्यांत चालू होईल. कोळशाच्या जळणानें वीज उत्पन्न करणाऱ्या केंद्रापेक्षा ह्या केंद्रांतील वीज महाग पडेल. पण हळूहळू ही किंमत कमी होईल असें तज्ज्ञांचें मत आहे.

**अरबी भाषेंत पत्रव्यवहार**—इजिप्तनें सुएझ कॅनॉल कंपनीचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर कामकाजासाठीं अरबी भाषा वापरण्याचें ठरविलें आहे. फ्रेंच भाषेचा वापर दुय्यम भाषा म्हणून चालू ठेवण्यांत येणार आहे. तथापि, कंपनीचा पत्रव्यवहार मात्र अरबी भाषेंतून करण्यांत येणार आहे. इजिप्तमध्यें आठवड्याची सुट्टी शुक्रवारीं असते. पण कांहीं दिवसपर्यंत कंपनीची सुट्टी रविवारींच दिली जाईल.


**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : –श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

**સુખી જીવનની પગદંડી**
( ગૃહજીવનનું માંગલ્ય )
લેખકઃ—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, " અર્થ "
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧–૮–૦

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**
( शिड्यूल्ड बँक )
हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ ☆ मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ☆ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )
अध्यक्ष श्री. ग. रा. साठे
अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५
खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००
उपाध्यक्ष श्री. वा. म. बापट
★ चालू खातें व्याज १ टक्का ☆ सेव्हिंग्ज खातें व्याज १॥ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
—श्री. गो. धों. जोगळेकर, ( बी. ए., (ऑ.), बी. कॉम, एलएल. बी. ) मॅनेजर

## महाराष्ट्र रिजनल कोऑपरेटिव्ह स्कूल, पुणें १

[ नं. १० बी. जे. रोड, टाटा लॉज पुणें १ ]

### कोऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा

### मार्च १९५६ रिझल्ट ( १७ वा शिक्षणवर्ग )

खालील विद्यार्थी परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत :—

**पहिला वर्ग**—श्री. बी. वाय. मालेराव, सी. सी. देवकर, टी. टी. मेटे, एच. डी. पाटील, एन. बी. शालगांवकर.

**दुसरा वर्ग**—श्री. के. एम. आगरवाल, आर. व्ही. अलाट, डी. आर. आळशी, एस. डी. तळेल, के. आर. भंडारी, पी. एल. भावसार, एन. एन. भोसले, व्ही. डी. भोसले, सी. एस. बोरसे, एस. ई. बोरसे, बी. जी. चौगुले, आर. पी. चोरडिया, के. के. चुरी, एस. एस. देशमुख, व्ही. बी. देशमुख, व्ही. जी. गवळी, डी. एल. घावटे, एम. जी. घुले, बी. आर. गोसावी, एस. एस. इनामदार, कु. कमल जोग, श्री. बी. डी. जोशी, एम. ए. केळकर, जी. एस. कुलकर्णी, व्ही टी. कुलकर्णी, ई. ए. लोहार, कु. कुसुम मदाने, श्री. जी. जी. महाजनी, बी. एस. माळी, आर. टी. मुळे, एस. एच. नारखेडे, के. ए. पाटील, एन. एस. पाटील, एस. आर. पाटील, जे. एस. पवार, बी. आर. पुजारी, एस. बी. साळुंखे, डी. ए. सावत, एच. जी. शेडगे, के. बी. शिंदे, टी. टी. सोनार, डी. टी. उंडे, एस. व्ही. उपलप, एन. टी. विघाटे, एच. एन. वाणी, एम. एम. झोडगे, व्ही. जी. झुंजारराव.

**तिसरा वर्ग**—श्री. व्ही. पी. चिले, आर. एस. ढमढेरे, एस. एस. खळदकर, बी. के. खलाटे, बी. एन. कुलकर्णी, आर. जे. माने, ए. बी. पाटील, बी. एस. पाटील, जे. जी. पाटील, व्ही. डी. राजे, आर. एन. सोनवणे, एम. डी. वाळिंबे, एस. एफ. दळवी.

मा. वि. मदाने
सुपरिन्टेन्डेन्ट.

---

## संगमनेर सेक्रेटरी शिक्षणवर्गाच्या परीक्षेचा निकाल

### प्रथम श्रेणी

( १ ) नवले त्र्यंबक दगडू.

### द्वितीय श्रेणी

( १ ) बिडवे बाळकृष्ण मुरलीधर, ( २ ) कुऱ्हाडे बाबू रामकृष्ण, ( ३ ) कदम विठोबा बंडू, ( ४ ) नायकवाडी गंगाधर हारी, ( ५ ) पन्हाळे भिमराज लक्ष्मण.

### तृतीय श्रेणी

( १ ) माटे मनोहर कृष्णाजी, ( २ ) भालेराव लक्ष्मण दत्तात्रय, ( ३ ) देशमुख भाऊराव बापूराव, ( ४ ) ढोकचवळे श्रीधर रामचंद्र, ( ५ ) माडेकर दत्तात्रय सदाशिव, ( ६ ) घुले गंगाधर तुकाराम, ( ७ ) सांबेकर जगन्नाथ गणपत, ( ८ ) कुलकर्णी दत्तात्रय रावजी, ( ९ ) लगड भगवान सर्जेराव, ( १० ) लाहुंडे गवळी दादा, ( ११ ) नरवडे शांताराम नानाजी, ( १२ ) नाईक दत्तात्रय बाप्पाजी, ( १३ ) निकुंभ मधुकर गंगाधर, ( १४ ) पठारे यशवंत लक्ष्मण, ( १५ ) राहाणे संपत संभाजी, ( १६ ) राहाणे तात्यासाहेब कृष्णाजी, ( १७ ) राहाणे किसन पंढरीनाथ, ( १८ ) राऊत एकनाथ पिराजी, ( १९ ) शेळके गंगाधर रघुनाथ, ( २० ) तनपुरे तबाजी नाना, ( २१ ) टेमक दगडू जयवंता.


## २ वर्षांत ४ आवृत्त्या

# कण आणि क्षण

## ( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : श्री. वा. काळे

१ ली आवृत्ति ( मराठी ) ऑक्टोबर, १९५३
२ री आवृत्ति ( मराठी ) जुलै, १९५४
१ ली आवृत्ति ( गुजराती ) फेब्रुवारी, १९५५
२ री आवृत्ति ( गुजराती ) नोव्हेंबर, १९५५

" महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक, श्री. श्रीपाद वामन काळे, ह्यांनीं प्रस्तुत पुस्तकाच्या द्वारें सुखी जीवनाची किल्लीच जणूं काय प्रत्येकाच्या हातीं दिली आहे. विषयाचें प्रतिपादन कलात्मक आणि सहज पटेल असें आहे. "

—दादासाहेब मावळंकर
( गुजराती प्रस्तावनेंत )

" प्रस्तुत पुस्तकावर महाराष्ट्रांतील समर्थ, विद्वान्, विचारक आणि साहित्यकार ह्यांनीं मुक्त हस्तानें व मुक्त कंठानें स्तुतिसुमनांचा वर्षाव केला आहे. गुजरात आणि महाराष्ट्र ह्यांतील जीवन, आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न ह्यांत किती साम्य आहे; त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील स्त्रियांचें जीवन हें शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या किती प्रगतिशील आहे, हें प्रस्तुत पुस्तक वाचत असतांना लक्षांत येतें. "

—प्रा. शशिन् ओझा
( गुजराती अनुवादक )

" पुस्तक स्त्री-वर्गालाच नव्हे, तर सर्वांनाच उपयोगी व मार्गदर्शक असल्यानें, त्याचा प्रसार करण्यासाठी सस्तु साहित्य कार्यालयानें [ " सस्तु साहित्य म्हणजेच उत्कृष्टांत उत्कृष्ट साहित्य " ] तें प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेचेंच आहे. "

—प्रा. अनंतराय रावळ
( गुजराती साहित्यिकांतील अग्रगण्य टीकाकार )

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, इरावती कर्वे, वि. द. घाटे, इंदिराबाई देवधर, त्याचप्रमाणें सर्व मराठी व गुजराती वृत्तपत्रें व मासिकें ह्यांचे अत्युत्कृष्ट अभिप्राय. डेक्कन व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीचा पुरस्कार व सरकारची मंजुरी.

मराठी पुस्तक : पृष्ठसंख्या १६८. किंमत २॥ रु.
सर्व पुस्तक-विक्रेत्यांकडे मिळतें.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९५१।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.